नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 14/07/2020 (मंगळवार)
(सायंकाळ)

---

## डब्ल्यु सी एल खदान क्र. 6 स्टोअर रूम मध्ये चोरी करणारे आरोपी गजाआड स्थानिक गुन्हे शाखा नागपूर (ग्रामीण), ची कार्यवाही

पोलिस ठाणे कन्हान हद्दीतील डब्लुसीएल खदान क्र. 6 येथील असलेल्या स्टोअर रूममध्ये घटना तारीख 12/07/2020 ते तारीख 13/07/2020 चे रात्री दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरानी स्टोअर रूमचे समोर आवारात ठेवलेले आरमर केबल, तांबा वायर व स्क्रॅप लोखंडाचे तुकडे असे एकुण कि. 13,000/—रू. चा माल चोरून नेल्याच्या तक्रारीवरून पो. स्टे. कन्हान येथे अप क्र. 290/2020 कलम 379, 34 भा.दं.वी अन्वये दाखल असून सदर गुन्हयाचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पथक कन्हान हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना पथकाला मिळालेल्या माहिती वरून त्यांनी संशयीत आरोपी नामे क्र. 1) सुरज किशोर सुर्यवंशी, वय 22 वर्ष, 2) अरूण छन्नीलाल कश्यप, वय 18 वर्ष तसेच 14 वर्षीय विधीसंघर्षग्रस्त बालक तीन्ही रा. खदान क्र. 6, कन्हान यांना ताब्यात घेवून विचारपुस केली असता त्यांनी सदरची चोरी केल्याचे कबुल केले. आरोपीतांच्या ताब्यातुन चोरीस गेलेला संपुर्ण मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. आरोपीतांना जप्त मुद्देमालासह पुढील कार्यवाही करीता पो. स्टे. कन्हानच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

सदर कार्यवाही श्री. राकेश ओला पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक श्री. अनिल जिट्टावार यांचे नेतृत्वात सफौ लक्ष्मीप्रसाद दुबे, हेकॉ सुरज परमार, निलेश बर्वे, नापोशि सत्यशिल कोठारे, शैलेश यादव, पोशि प्रनयसिंग बनाफर, विरेन्द्र नरड व चा.सफौ साहेबराव बहाळे यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर